| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| CNR No.MHKO200003722018 | दाखल तारीख | – | १४ | १२ | २०१८ |
| | नोंदणी तारीख | – | १४ | १२ | २०१८ |
| | निकाल तारीख | – | ०६ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०७ | ०४ | २३ |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर</u>**
**<u>यांचे न्यायालयात ( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे)</u>**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.१७८/२०१८**
**न्यायनिर्णय नि.क्र.६ सोबत**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक ०६ मे २०२६**

पन्हाळा पोलीस ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर गुन्हा नोंद क्रं.९८/२०१८ भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>पन्हाळा पोलीस ठाणे, ता.पन्हाळा,<br>जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | | बाबाजी नामदेव भोसले, व.व.३२,<br>रा. परळी पैकी कासारवाडी, पोस्ट नांदगाव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर |
| आरोपी तर्फे वकील | | ॲड. श्री. एम. एस. भोसले |

**<u>भाग–ब</u>**
**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २१.०५.२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०४.०७.२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १४.१२.२०१८ |

| | | |
|---|---|---|
| प्ली निश्चित केल्याचा दिनांक | :– | १४.१२.२०१८ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०५.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०६.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाबाजी नामदेव भोसले | फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | १४.१२.२०१८ | भा.दं.वि. कलम २७९, ३३८ व मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे | निर्दोष मुक्त | –– | –– |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी महादेव पाटील | घटनास्थळ पंच | ६ |
| २. | बाळासो रत्नाप्पा कुंभार | फिर्यादी | ६ |
| ३. | विजय सर्जेराव पाटील | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ६ |
| ४. | बळवंत पांडूरंग साळवी | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ६ |
| ५. | आनंदा नारायण यादव | तपासी अंमलदार | ६ |

**ब. बचाव पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

## अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

**अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २९ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ३० | फिर्याद |
| ३. | ३५ | जखमी ओंमकार बाळासो कुंभार यांचे जखमी वैद्यकीय प्रमाणपत्र (आरोपीतर्फे मान्य) |
| ४. | ३७ | तपासाचा लेखी आदेश |
| ५. | ३८ | आरोपीस दिलेली फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(अ) ची नोटीस |
| ६. | ३९ | अपघातील वाहनांची तांत्रीक तपासणी प्रमाणपत्र |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ६ | प्ली |
| ३. | ६ | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन |

**ड. मुद्देमालाचे विवरण**

| मालमत्तेचे वर्णन | निशाण क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | -- | -- |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक – ०६ मे २०२६ रोजी घोषित)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९,३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची संपरिक्षा झालेली आहे.

०२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दि.२१/०५/२०१८ रोजी १६.०० वाजताचे सुमारास माजगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या हद्दीतील आंबाबाई मंदिर समोरील रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.–०९–ए.एल.९८१६ या ट्रॅक्टरला ट्रॉली नं.एम.एच.–०९–ए.एल.२२७४ या नंबरची ट्रॉली जोडून आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर सह ट्रॉली हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने चालवून समोरुन एका सायकलवरुन दोन लहान मुले डबल सिट बसुन आले असता त्या लहान मुलांचे ताब्यातील सायकलचे हॅडलला धडक देवुन अपघात करुन सायकलवर पाठीमागे बसलेला कु. ओंकार बाळासो कुंभार याचे उजवे पायाचे पिंढरीवरुन ट्रॅक्टरचे मोठे चाक घालवुन त्यास गंभीर दुखापत करणेस कारणीभुत झाला तसेच अपघाताची वर्दी न देता आरोपी तसाच निघुन गेला. त्यानंतर कु. ओंकार बाळासो कुंभार यास सिटी हॉस्पीटल, राजारामपुरी, कोल्हापूर येथे नेवून उपचाराकरीता ॲडमीट केले. ओंकारची तब्येत गंभीर असल्याने फिर्यादी हे भांबावुन गेले होते व फिर्यादीला दवाखान्यातुन ओंकारजवळुन कोठे जाता आले नाही.

०३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पन्हाळा पोलीस ठाणे, गु.र.नं.९८/२०१८ भारतीय दंड संहिता कलम २७९,३३७,३३८ सह मोटर वाहन कायदा कलम १८४,१३४(१)(ब) अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंदविण्यात आला. सदर घटनेचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल २/२००० ए.एन.यादव यांनी केला असुन तपासिक अधिका–याने तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा नोंदवला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र, अपघातग्रस्त वाहनांची तपासणी अहवाल व इतर कागदपत्रे प्राप्त करुन अभिलेखावर दाखल केली व केलेल्या तपासांती आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

०४. माझे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपीस नि.क्र६ नुसार भारतीय दंड संहिता कलम २७९,३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४(१)(ब) अन्वये शिक्षापात्र गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगण्यात आला असता आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०५. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी एकुण पाच साक्षीदारांचा साक्षीपुरावा नोंदविला असुन आरोपीतर्फे विधीज्ञांनी सदर साक्षीदारांचा उलटतपास नोंदवला आहे. अभियोगपक्षाने कांही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. आरोपीतर्फे नि.क्र.३५ कडे ओंकार बाळासो कुंभार यांचे जखमांचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले आहे. तद्नंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन अभियोगपक्षाचा पुरावा नि.क्र.१ कडील दि.१६/०३/२०२६ रोजीचे आदेशाने बंद करणेत आला. तद्नंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदवले असता आरोपीने खोटी केस केली

असल्याचा बचाव घेतला, परंतु आरोपीने त्याचे बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत –

| अ.क्र | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, दि.२१/०५/२०१८ रोजी १६.०० वाजताचे सुमारास माजगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या हद्दीतील आंबाबाई मंदिर समोरील रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.–०९–ए.एल.९८१६ या ट्रॅक्टरला ट्रॉली नं.एम.एच.–०९–ए.एल.२२७४ हे ट्रक्टर सह ट्रॉली मानवी जिवित धोक्यात येईल अथवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचेल इतक्या बेदरकारपणे हयगयीने चालवून सायकलवरुन दोन मुले जात असलेल्या सायकलला धडक देवुन अपघात केला व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की,वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.–०९–ए.एल.९८१६ या ट्रॅक्टरला ट्रॉली नं.एम.एच.–०९–ए.एल.२२७४ हे ट्रक्टर सह ट्रॉली ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून समोरुन एका सायकलवरुन दोन लहान मुले डबल सिट बसुन आले असता त्या लहान मुलांचे ताब्यातील सायकलचे हॅंडलला धडक देवुन अपघात करुन सायकलवर पाठीमागे बसलेला कु.ओंकार बाळासो कुंभार याचे उजवे पायाचे पिंढरीवरुन ट्रॅक्टरचे मोठे चाक घालवुन त्यास गंभीर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपीने | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड सहिंता कलम ३३८ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.–०९–ए.एल.९८१६ या ट्रॅक्टरला ट्रॉली नं.एम.एच.–०९–ए.एल.२२७४ ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवुन अपघात केला व त्याद्वारे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ४. | अभियोगपक्ष शाबीत करतात का की, वर नमुद तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.–०९–ए.एल.९८१६ या ट्रॅक्टरला ट्रॉली नं.एम.एच.–०९–ए.एल.२२७४ ही ट्रॅक्टर ट्रॉलीसह भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवुन सायलवरील दोन लहान मुलांना धडक देवुन अपघात करुन पोलीसांना अपघाताची खबर न देता व गंभीर जखमी कु.ओंकार बाळासो कुंभार ला वैद्यकीय मदत न देता तेथून पळून गेलात म्हणून आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १३४(१)(ब) प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | आरोपीची प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोषमुक्तता करण्यात आली. |

<u>**का र ण मि मां सा**</u>

<u>**प्रश्नबिंदू क्र. १ ते ४ करीता**</u> –

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूचे विश्लेषण एकत्रित केले आहे.

०८. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचा मुख्य साक्षीदार क्र.२ बाळासो रत्नाप्पा कुंभार **(फिर्यादी/नि.क्रं.६)** यांचे मौखिक पुराव्यात असे आले आहे की, त्याच्या मोठया मुलाचे नाव ओंकार बाळासो कुंभार असे असुन सन २०१८ साली त्याचा मुलगा १२ वर्षांचा होता व तो त्यांच्या मामांकडे कोकरुड, ता. शिराळा, जि. सांगली या ठिकाणी शिक्षणासाठी थांबला होता. मे. २०१८ मध्ये त्याचा मुलगा सुट्टीकरीता माजगाव येथे आला होता. दि.२१/०५/२०१८ रोजी त्याचा मुलगा ओंकार याचा अंबाबाई मंदिरजवळ अपघात झाला होता. त्यावेळी ते बाहेर होते. त्यांना अपघाताबाबत विजय पाटील यांनी फोनवरुन कळवले. ते घटनास्थळी जात असताना त्याला त्याचा मुलगा बोलेरो गाडीतून नेत असताना दिसला. त्यानंतर त्याला त्यांनी गाडीत बसून उपचाराकामी सी.टी. हॉस्पीटल येथे नेले. त्याच्या मुलाचा अपघात कसा झाला ही बाब गावातील लोकांकडून त्यांना समजली. तसे सदरचा अपघात ट्रॅक्टरनी झाल्याचे समजले. सदरचा अपघात हा ट्रॅक्टर ड्रायव्हर भोसले याच्या चुकीमुळे झाला. त्यानंतर त्यांनी जखमी ओंकार वर सी.टी. हॉस्पीटलला उपचार घेतले आणि जुलै २०१८ मध्ये आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदरची फिर्याद (नि.क्र.३०) दाखवली असता तीच असल्याचे, त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. आरोपी न्यायालयात हजर आहे असे सांगितले.

०९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ विजय सर्जेराव पाटील **(प्रत्यक्षदर्शी/नि.क्रं.६)** हा सदर अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्याचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, ते बाळासो कुंभार व त्यांचा मुलगा ओंकार कुंभार यांना ओळखतात. दि.२१/०५/२०१८ रोजी ते व त्यांचा मित्र बळवंत साळवी हे अंबाई दुध संस्थेच्या समोर अंदाजे संध्याकाळी ४ चे सुमारास बोलत होते. त्यावेळी माने गल्ली कडून एक ट्रॅक्टर आला, त्यावेळी साहिल कुंभार व ओंकार कुंभार

हे सायकलवरुन फिरत होते. सदरची सायकल साहिल चालवत होता. त्यावेळी ट्रॅक्टरचा धक्का साहिलच्या सायकलला लागल्यामुळे दोघेही खाली पडले. साहिल गटर्समध्ये पडला. ओंकार रस्त्यावर पडला व त्याच्या उजव्या पायावरुन ट्रॅक्टरचे मोठे चाक गेले. त्यावेळी ट्रॅक्टर तसाच पुढे निघून गेला. त्याला ट्रॅक्टरचा नंबर माहित नाही कारण ओंकारला लागले होते त्या नादात त्याने ट्रॅक्टरचा नंबर पाहिला नाही. त्यानंतर त्याने ओंकारच्या वडीलांना बोलावून घेतले. ओंकारचे वडील अपघात स्थळी आले व त्यांनी ओंकारला दवाखान्यात नेले. त्याने ट्रॅक्टर चालकाला पाहिले नव्हते. ट्रॅक्टर चालकाचे नाव बाबाजी भोसले आहे असे त्याला ओंकारच्या वडीलांकडून समजले. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवून घेतला होता.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ बळवंत पांडूरंग साळवी **(प्रत्यक्षदर्शी/नि.क्रं.६)** हे ही सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्याचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, ते बाळासो कुंभार व त्यांचा मुलगा ओंकार कुंभार यांना ओळखतात. दि.२१/०५/२०१८ रोजी ते व त्यांचा मित्र विजय पाटील हे अंबाई दुध संस्थेच्या समोर अंदाजे संध्याकाळी ४ चे सुमारास बोलत होते. त्यावेळी माने गल्ली कडून एक ट्रॅक्टर आला, त्यावेळी साहिल कुंभार व ओंकार कुंभार हे सायकलवरुन फिरत होते. सदरची सायकल साहिल चालवत होता. त्यावेळी ट्रॅक्टरचा धक्का साहिलच्या सायकलला लागल्यामुळे दोघेही खाली पडले. साहिल गटर्समध्ये पडला. ओंकार रस्त्यावर पडला व त्याच्या उजव्या पायावरुन ट्रॅक्टरचे मोठे चाक गेले. त्यावेळी ट्रॅक्टर तसाच पुढे निघून गेला. त्याला ट्रॅक्टरचा नंबर माहित नाही कारण तो ओंकारला लागले होते त्या नादात त्याने ट्रॅक्टरचा नंबर पाहिला नाही. त्यानंतर त्याने ओंकारच्या वडीलांना बोलावून घेतले. ओंकारचे वडील अपघात स्थळी आले व त्यांनी ओंकारला दवाखान्यात नेले. त्याने ट्रॅक्टर चालकाला पाहिले नव्हते. ट्रॅक्टर चालकाचे नाव बाबाजी भोसले आहे असे त्याला ओंकारच्या वडीलांकडून नंतर समजले. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवून घेतला होता.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ आनंदा नारायण यादव **(तपासी अधिकारी/नि.क्र.६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.०३/०७/२०१८ रोजी ते हवालदार म्हणुन पन्हाळा पोलीस स्टेशनला कार्यरत असताना गु.र.नं.९८/२०१८ चा तपास त्यांच्याकडे लेखी आदेश (नि.क्र.३७) अन्वये आला. दोन पंचासमक्ष अपघातस्थळाचा पंचनामा केला. अपघातस्थळ हे माजगाव येथील अंबाबाईच्या मंदिराजवळ आहे. त्याठिकाणी दोन लहान मुले सायकलवरुन जात होती समरुन ट्रॅक्टरवाल्याने सायकलवरील मुलांना धडक दिली. वस्तुस्थितीनुसार पंचनामा केला. सदरचा पंचनामा नि.क्र.२९ वर दाखल आहे. त्यानंतर जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र (नि.क्र.३५) प्राप्त करुन ते प्रस्तुत कामात दाखल केले. आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(अ) ची नोटीस दिली. सदरची नोटीस (नि.क्र.३८) दाखवली असता ती तीच आहे, त्यावर त्यांची व आरोपींची सही आहे असे सांगितले. अपघातातील वाहनांची तांत्रीक तपासणी केली. साक्षीदारास सदरचे प्रमाणपत्र (नि.क्र.३९) दाखवले असता ते तेच आहे असे कथन केले. आरोपींविरुध्द गुन्हा निष्पन्न झालेने न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले. आरोपी न्यायालयात हजर असल्याचे सांगितले.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ शिवाजी महादेव पाटील **(घटनास्थळ पंच/नि.क्र.६)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.०४/०७/२०१८ रोजी पन्हाळा पोलीसांनी त्याला माजगांव येथील अंबाबाई मंदिराच्या चौकात पंचनामा करणेसाठी बोलावले होते. त्या ठिकाणी पोलीसांनी अपघातग्रस्त जागेचा पंचनामा केला. साक्षीदारास सदरचा घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२९) दाखवला असता तो तोच आहे, त्यातील अनुक्रमांक १ वर त्याची सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे असे सांगितले.

**१३.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास

पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ बाळासो रत्नाप्पा कुंभार (फिर्यादी/नि.क्रं.६) यांनी आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, कृष्णात माने, महादेव पाटील, ज्ञानदेव गुरव हे त्यांच्या गावातील राहणारे असून ते त्यांना ओळखतात त्यांच्या गावात आंबाबाई मंदिराचे शेजारी मडेश्वर मंदिर आहे मंदिराच्या पुर्वेस दक्षिणोत्तर जाणारा मुख्य रस्ता आहे गणपती मंदिरासमोर सुरेश गणपती पाटील यांचे घर आहे. त्यांनी ऐकिव स्वरुपाची माहिती पोलीसांना दिली होती दि. ०२/०७/२०१८ पूर्वी त्यांनी धडक दिलेल्या टॅक्टरची चौकशी केली होती. पेशंटला डिस्चार्ज घेण्यापुवी त्यांना माहिती झाली होती. माजनाळ गावापासुन पन्हाळा हे गाव १२ कि. मी. अंतरावर आहे. बाबाजी भोसले यांना अपघाताचे वेळी ते ओळखत नव्हते त्यांनी प्रत्यक्ष अपघात पाहिलेला नाही. त्यांना नुकसान भरपाई मिळावी या उददेशाने त्यांनी जिल्हा प्राधिकरणाकडे प्रकरण दाखल केले आहे.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ विजय सर्जेराव पाटील (प्रत्यक्षदर्शी/नि.क्रं.६) यांनी उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, अपघात स्थळ हे त्यांच्या गावाच्या पुर्व बाजुला आहे. सदर रस्त्यावर दिवसभर वाहनांची वर्दळ असते. अपघात स्थळाच्या ५० मी. अंतरावर अंबाबाईचे मंदिर आहे. मंदिराच्या १०० मी. अंतरावर दुध संकलन आहे. सदर मंदिरात लोकांची वर्दळ असते. त्या ठिकाणी २० ते २५ लोक होते. ट्रॅक्टर धडकुन गेला हे त्यांनी लांबून पाहिले आहे. त्यांनी प्रत्यक्षात ट्रक्टरचा नंबर, कंपनी त्याचे चालक या बाबी पाहिल्या नाहीत. जखमी ओंकार हा दीड महिने उपचाराकरीता दवाखान्यात दाखल होता. त्यांनी किंवा

जमलेल्या लोकांनी ट्रॅक्टरला अडविण्याचा प्रयत्न केला नाही.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ बळवंत पांडूरंग साळवी (प्रत्यक्षदर्शी/नि.क्रं.६) यांनी आरोपींच्या वकिलांतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासात असे कबुल केले की, सदर रस्तयावर दिवसभर वाहनांची वर्दळ असते अपघात स्थळाच्या ५० मी. अंतरावर अंबाबाईचे मंदिर आहे. मंदिराच्या १०० मी. अंतरावर दुध संकलन आहे. ट्रॅक्टर धडकुन गेला हे त्याने लांबून पाहिले आहे. त्यांनी किंवा जमलेल्या लोकांनी सदर ट्रॅक्टर थांबविण्याचा प्रयत्न केला नाही.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ आनंदा नारायण यादव (तपासी अधिकारी/नि.क्र.६) यांनी उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, दि. ०३/०७/२०१८ इ रोजी फिर्याद दाखल झाली सदर फिर्यादीत दि.२१/०५/२०१८ रोजी अपघात झाल्याचे नमुद होते. दि.२१/०५/२०१८ ते ०३/०७/२०१८ या काळात फिर्यादी, फिर्यादीचे गावचे संबंधित लोक यांनी फिर्याद दाखल केली नाही. माजगाव हे गाव त्यांच्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येते. अपघात घडल्याची नोंद त्वरीत त्यांच्या पोलीस स्टेशनकडे घेतली जाते. जखमी लोकांना वैद्यकीय उपचाराकरीता पाठवायचे असल्यास संबंधीत डॉक्टर संबंधित पोलीसांचा जबाब घेतात सदर अपघाताची ० नंबरने फिर्याद दाखल होऊन त्यांच्या पोलीस स्टेशनकडे वर्ग केली जाते परंतु प्रस्तुत प्रकरणात तसे काही घडले नसल्याचे त्यांनी मान्य केले फिर्याद दाखल होण्यापुर्वी त्यांनी अपघाताची चौकशी केली नाही. तसेच अपघात झाल्याची वर्दी दाखल केली नाही. त्यांनी फिर्यादीचे सांगणेवरुन साक्षिदारांचे जबाब नोंदवले आहेत. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार हे फिर्यादीचे जवळचे मित्र व नातेवाईक अशांचेच त्यांनी जबाब नोंदवुन घेतले आहेत.

**१८.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ शिवाजी महादेव पाटील (घटनास्थळ पंच/नि.क्र.६) यांनी उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की,

दि.०४/०७/२०१८ इ रोजी ते नेहमीप्रमाणे शाळेला गेले होते व ते पुर्ण दिवस शाळेत होते. फिर्यादी बाळासाहेब कुंभार हे त्यांच्या गावचे असून ते त्यांचे चांगले मित्र आहेत. त्यांनी तयार पंचनाम्यावर सही केली. घटनास्थळ हे त्यांच्या कायमचे पाहण्यात असुन चांगल्या परिचयाचे आहे.

१९. अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, साक्षीदार क्रं.२ फिर्यादी बाळासो कुंभार यांनी दि.०२/०७/२०१८ पूर्वी धडक दिलेल्या ट्रॅक्टरची चौकशी केली होती. दि.२१/०५/२०१८ ते ०२/०७/२०१८ या काळात त्यांचा भाऊ व भावजय यांनी फिर्याद दिली नाही कारण ते गोंधळून गेले होते. आरोपी बाबाजी भोसले यांना अपघाताच्या वेळी ते ओळखत नव्हते. त्यांनी प्रत्यक्ष अपघात पाहिला नसल्यामुळे केवळ ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष नोंदवली आहे. साक्षीदार क्रं.३ विजय पाटील व साक्षीदार क्रं.४ बळवंत साळवी यांनी उलटतपसामध्ये असे मान्य केले आहे की, अपघातस्थळ हे वर्दळीचे ठिकाण असुन ट्रॅक्टर धडकून गेला हे त्यांनी लांबून पाहिले आहे. त्यांनी प्रत्यक्षात ट्रॅक्टरचा नंबर, कंपनी, त्याचे चालक या बाबी पाहिलेल्या नाहीत. परंतु, जखमी ओंकार हा दीड महिने उपचाराकरिता दवाखान्यात दाखल होता. त्यांनी किंवा अपघातस्थळावर जमलेल्या इतर लोकांनी ट्रॅक्टरला अडवण्याचा प्रयत्न केला नाही. तसे करण्यास त्यांना कोणतीही अडचण नव्हती.

२०. साक्षीदार क्रं.५ आनंदा यादव तपासी अंमलदार यांनी सदर अपघाताची फिर्याद दाखल होण्यापूर्वी चौकशी केली नाही तसेच अपघात झाल्याची वर्दी दाखल केली नाही. मुळात सदरचे गांव हे त्यांचे बिट अंतर्गत येत असुन त्यांना वर्दी दाखल करणेस कोणतीही अडचण नव्हती. त्यांनी त्यांच्या उलटतपसामध्ये फिर्यादीचे जवळचे नातेवाईक व मित्र यांचेच जबाब नोंदवले असल्याचे मान्य केले आहे. याचाच अर्थ त्यांनी प्रत्यक्षदर्शी व स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदवली नाही.

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ अपघातस्थळ पंच शिवाजी पाटील यांनी दि.०४/०७/२०१८ रोजी ते पुर्ण दिवस शाळेत होते. त्यांनी पोलीसांनी तयार केलेल्या पंचनामेवर सही केली याचाच अर्थ सदर घटनास्थळ पंच हा घटनास्थळी हजर नव्हता केवळ पोलीसांच्या सांगण्यावरुन त्याने घटनास्थळ पंचनामेवर सही केली आहे. मुळात अपघातस्थळाचा पंचनामा अभियोगपक्षाने सक्तरित्या शाबित केलेला नाही. तसेच साक्षीदार क्रं.३ व ४ यांनी ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष नोंदवली आहे. सगळयात महत्वाची बाब म्हणजे तपासी अंमलदार यांनी प्रत्यक्ष व स्वतंत्र दर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली नाही.

२१. अभियोगपक्षाच्या पुराव्यास पृष्टी देणारा कोणताही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच आरोपी हा घटनेच्यावेळी त्याचे ताब्यातील वाहन नेमका कशाप्रकारे चालवित होता व अपघतामध्ये त्याची चुक होती असा संशयरहित सबळ पुरावा अभिलेखावर आलेले नाही. अभिलेखावरील साक्षीदारांचा संशयरहीत मौखिक पुरावा आरोपीने त्याचेवर दोषारोपात केलेला गुन्हा संशयापलिकडे जावुन सिध्द करणेस पुरेसा नाही. अभियोगपक्षाने कायदयाप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, संबंधीत दिवशी व वेळी आरोपी हा त्याचे ताब्यातील वाहन हे हयगयीने व बेदरकारपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवुन समोरुन एक सायकलवरुन साहिल कुंभार व ओंकार कुंभार ही दोन लहान मुले डबल सिट बसुन चालवत असलेल्या सायकलला धडक देवुन अपघात करुन सायकलवरील दोन्ही लहान मुले खाली पडली असता सायकलवर पाठीमागे बसलेला कु. ओंकार बाळासो कुंभार याचे उजवे पायावरुन ट्रॅक्टरचे मोठे चाक गेलेने त्यांस गंभीर दुखापत पोहोचवली व अपघाताची माहिती जवळील पोलीस चौकत न देता तसेच जखमीला उपचाराची कोणतीही उपाययोजना न करता तेथुन निघुन गेला ही बाब संशयापलीकडे सिध्द

होत नसून आरोपीने सदरचा गुन्हा केला आहे किंवा नाही याबाबत संशय निर्माण होत आहे. त्याचा फायदा निश्चितच आरोपीच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.**

**प्रश्नबिंदू क्रमांक ५ करीता** –

**२२.** प्रश्नबिंदू क्रमांक १ ते ४ यांच्या विश्लेषणांती अभियोगपक्षतर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा संयापलिकडे सिध्द झाला नसल्यामुळे आरोपी प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणात कोणताही मुद्देमाल जप्त नाही. सबब, प्रश्नबिंदू क्र.५ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत–

## आदेश

१. आरोपी बाबाजी नामदेव भोसले रा. परळी पैकी कासारवाडी, पोस्ट – नांदगाव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९,३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४(१)(ब) अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तीक व त्याच रक्कमेचे जामीन बंधपत्र दयावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VAISHALI
Date: 2026.05.06 17:58:48 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक ०६.०५.२०२६
कळे–खेरीवडे.